# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक
**महत्त्वाचे**

क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/ 2688

दिनांक : 23 SEP 2015

प्रति,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत. . . . . . . . . . . . . .
संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/२६६१, दि. १५/०९/२०१५

संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, नजिकच्या कालावधीत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज भरुन घेण्याकरिता तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील EBC Concession या लिंकवर तरतूद करण्यांत येणार आहे.

तत्पूर्वी सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे अर्ज भरुन घेताना आवश्यक असलेली कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयाच्या स्तरावर दि. ३०/०९/२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता **"EBC Orientation Programme-2015"** आयोजित केलेला आहे.

**कार्यक्रमाचे स्थळ :**

**ऑडिटोरियम हॉल,**
**शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई**
**४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**वरील कार्यक्रमात अत्यंत महत्त्वाच्या सूचना देण्यांत येणार आहेत.** त्यामुळे आपल्या संस्थेतील ईबीसी प्रकरण हाताळणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांनाच सदर कार्यक्रमांस न चूकता पाठवावे. तसेच सदर कार्यक्रमांस उपस्थित राहताना संस्थेच्या प्रतिनिधीसोबत संदर्भीय परिपत्रकाची प्रत सोबतच्या सर्व सहपत्रांसह घेऊन उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. ज्या संस्थाचे प्रतिनिधी ह्या कार्यक्रमास सबळ कारणाशिवाय गैरहजर राहतील अशा संस्थांना नंतर कोणतेही मार्गदर्शन केले जाणार नाही. याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई